खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे

# हुतात्मा राजगुरू महाविद्यालय

राजगुरूनगर, ता. खेड, जि.पुणे

## प्रसिद्धी विभाग

## शैक्षणिक वर्ष २०२० – २१

## हुतात्मा राजगुरू जयंती : अभिवादन कार्यक्रम

लोकमत

# हुतात्मा राजगुरुंच्या बलिदानाची आठवण ठेवा

## आढळराव पाटील : राजगुरुनगर येथे जयंतीनिमित्त अभिवादन

लोकमत न्यूज नेटवर्क



हुतात्मा राजगुरु यांच्या जयंतीनिमित्त स्मृतिशिल्पाला पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करताना माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील व मान्यवर.

भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील अग्रगण्य क्रांतिवीर हुतात्मा शिवराम हरी राजगुरु यांच्या जयंतीनिमित्त राजगुरुनगर येथे सोमवारी (दि. २४) अभिवादन कार्यक्रम झाला. राजगुरुनगर बस स्थानक आवारातील हुतात्मा राजगुरु, भगतसिंग व सुखदेव यांच्या स्मृतिशिल्पांना पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केल्यावर आढळराव पाटील बोलत होते.

राजगुरुनगर : स्वातंत्र्यलढ्यात इंग्रजांबरोबर क्रांतिकारकांनी कडवा संघर्ष केला. त्यांच्या योगदानातून आणि बलिदानातून देशाला स्वातंत्र्य मिळाले. सध्याच्या कोरोनाच्या संकटाला सामोरे जाताना स्वातंत्र्यपूर्व काळातील क्रांतिकारकांची मानसिकता अंगीकारण्याची गरज असल्याचे प्रतिपादन माजी खासदार तथा शिवसेनेचे उपनेते शिवाजी आढळराव पाटील यांनी केले.

जुलमी राजवटीतून अखंड भारत देशाला मुक्त करण्यासाठी स्वातंत्र्यवीरांनी अनेक यातना मुकाटपणे सहन केल्या. आजच्या संकटकाळात या योगदानाचे स्मरण करा आणि स्वत:सह समाजाचे हित जोपासण्याचे ध्येय निश्चित करा, असे आवाहन आढळराव पाटील यांनी केले.

यावेळी प्रांताधिकारी संजय तेली, तहसीलदार सुचित्रा आमले, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, सेनेच्या विजया शिंदे, ॲड. मुकुंद आवटे, कोंडीभाऊ टाकळकर आदी उपस्थित होते. दरम्यान, आमदार दिलीप मोहिते पाटील, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा निर्मला पानसरे यांनी क्रांतिकारकांच्या स्मृतिशिल्पांना पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.

राष्ट्रवादी काँग्रेसचे राजगुरुनगर शहर अध्यक्ष सुभाष होले, दिलीप होले, वैभव नाईकरे आदी यावेळी उपस्थित होते.

हुतात्मा राजगुरु यांचे जन्मस्थान असलेल्या राजगुरुवाड्यावर अभिवादन कार्यक्रम झाला. खेड पोलीस ठाण्याचे निरीक्षक सतीश गुरव यांच्या हस्ते वाड्यावर ध्वजारोहण करण्यात आले. हुतात्मा राजगुरु स्मारक समितीचे सुशील मांजरे, संदीप वाळुंज, शैलेश रावळ, विठ्ठल पाचारणे, अमित टाकळकर यावेळी उपस्थित होते.

Hello Pune Gramin
Page No. 2 Aug 25, 2020
Powered by: erelego.com

पुढारी

# संकटकाळात क्रांतिकारकांच्या यातनांचे स्मरण करा

## शिवसेनेचे उपनेते आढळराव पाटील यांचे आवाहन

**राजगुरुनगर : पुढारी वृत्तसेवा**

जुलमी राजवटीतून अखंड भारत देशाला मुक्त करण्यासाठी स्वातंत्र्यवीरांनी अनेक यातना मुकाटपणे सहन केल्या. आजच्या संकटकाळात या योगदानाचे स्मरण करा आणि स्वत:सह समाजाचे हित जोपासण्याचे ध्येय निश्चित करा, असे आवाहन माजी खासदार तथा शिवसेनेचे उपनेते शिवाजीराव आढळराव पाटील यांनी केले.

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील अग्रगण्य क्रांतिवीर हुतात्मा शिवराम हरी राजगुरू यांच्या ११२ व्या जयंतीनिमित्त राजगुरुनगर येथे सोमवारी (दि. २४) अभिवादन कार्यक्रम झाला. राजगुरुनगर बस स्थानक आवारातील हुतात्मा राजगुरू, भगतसिंग व सुखदेव यांच्या स्मृतिशिल्पांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केल्यावर आढळराव पाटील बोलत होते.



**हुतात्मा राजगुरू यांच्या ११२ व्या जयंतीनिमित्त स्मृतिशिल्पाला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील व मान्यवर.**

कोरोना संसर्गाच्या पार्श्वभूमीवर अल्प उपस्थितीत झालेल्या अभिवादन कार्यक्रमात प्रांताधिकारी संजय तेली, तहसीलदार सुचित्रा आमले, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, सेनेच्या विजयाताई शिंदे, ॲड. मुकुंद आवटे, कोंडीभाऊ टाकळकर, धर्मनाथ पवळे आदी उपस्थित होते.

दरम्यान आमदार दिलीप मोहिते पाटील, जिल्हा परिषदेच्या अध्यक्षा निर्मलाताई पानसरे यांनीदेखील क्रांतीकारकांच्या स्मृतिशिल्पांना पुष्पहार अर्पण करीत अभिवादन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे राजगुरुनगर शहराध्यक्ष सुभाष होले, दिलीप होले, वैभव नाईकरे आदी उपस्थित होते. हुतात्मा राजगुरू यांचे जन्मस्थान असलेल्या राजगुरू वाड्यावर अभिवादन कार्यक्रम झाला. खेड पोलिस ठाण्याचे निरीक्षक सतीश गुरव यांच्या हस्ते वाड्यावर ध्वजारोहण करण्यात आले. हुतात्मा राजगुरू स्मारक समितीचे सुशील मांजरे, संदीप वाळुंज, शैलेश रावळ, विठ्ठल पाचारणे, अमित टाकळकर, राजगुरुनगरच्या मंडल अधिकारी सविता घुमटकर या वेळी उपस्थित होते.

My Gramin Edition
Aug 25, 2020 Page No. 1
newspaper.pudhari.co.in

डॉ. संजय शिंदे
प्रसिद्धी विभाग प्रमुख